# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

(महाराष्ट्र शासन अधिसुचना क्रमांक २००७/(३२२/०७) विशि–४ महाराष्ट्र अधिनियम १९९४ (१९९४ च महा.३५) च्या कलम ३ च्या पोटकलम (२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर २०११रोजी स्थापित व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठअधिनियम क्रमांक ६) द्वारा संचालित राज्य विद्यापीठ)

## नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य विभाग

एम. आय. डी. सी. कॉम्पलेक्सरोड, गडचिरोली –४४२६०५ (महाराष्ट्र)

दुरध्वनी क्र. ०७१३२–२२३१२० भ्रमणध्वनी क.९८२२४६९६०९email:-diilgug@gmail.com, udmanish@gmail.com


**पत्र क्र. गोवि./न.न.व.सा.वि/७०२/२०२०** दिनांक: १७.०६.२०२०

प्रति,

प्राचार्य
सर्व संलग्नित महाविद्यालय
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

विषय:– प्राध्यापकांसाठी ऑनलाईन अध्यापन तंत्र प्रशिक्षणाबाबत.

संदर्भ:–१) रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनीचे संस्था बांधणी आणि नेतृत्व अध्ययन केंद्र यांचे पत्र दि. १२/०६/२०.

उपरोक्त संदर्भाकीत विषयानुसार कळविण्यात येते की, प्राध्यापक वर्गाच्या प्राथमिक गरजा लक्षात घेता डिजिटल माध्यामांद्वारे विविध ॲप्लिकेशन्स वापरून मीटिंग आयोजित करणे, अनेक लोकांशी एकाच वेळी व्हिडिओ कॉलच्या माध्यामातून संवाद साधणे, ऑनलाइन माध्यमातून वर्गासाठी अध्यापन करणे, विद्यार्थ्यांशी संवाद साधणे, विद्यार्थ्यांना गृहपाठ देणे, त्यांच्याकडून तो जमा करून घेणे इत्यादी बारकावे प्राथमिक प्रशिक्षण अभ्यासक्रमात काळाची गरज बनली आहे. त्यासाठीची उपयुक्त माध्यमे कशी हाताळावीत, त्यातील तांत्रीक बाबी आणि बारकावे, त्यांच्या गरजा, ही माध्यमे हाताळताना घ्यावयाची काळजी या सर्व गोष्टींचे प्रशिक्षण देणारा **तीन दिवसांचा अभ्यासक्रम** रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनीने तयार केलेला आहे. हा अभ्यासक्रम रोज प्रत्येकी दोन तास या कालावधीचा असेल. प्रत्येक दिवशी शेवटचा अर्धा तास सहभागी प्रशिक्षणार्थींना प्रशिक्षकांशी चर्चा करण्यात येईल. या कार्यशाळेचे ई–प्रमाणपत्र प्रत्येक सहभागीला मिळेल. तीन दिवसांच्या ऑनलाइन कार्यशाळेसाठी प्रति सहभागी रू. ८५०/–(रूपये आठशे पन्नास फक्त) अधिक १८% जी.एस.टी सह शुल्क आकारण्यात येईल. ही कार्यशाळा सर्व प्राध्यापकांसाठी निश्चितच उपयुक्त ठरेल करीता आपल्या महाविद्यालयातील प्राध्यापक वृंदास सदर प्रशिक्षणात सहभागी होण्याकरीता प्रोत्साहीत करण्यासंबंधी सानूग्रह.

धन्यवाद!

17-6-2020

संचालक
नवोपक्रम नवसंशोधन व साहचर्य विभाग

प्रा. मनिष द. उत्तरवार
संचालक
नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली-४४२६०१

प्रपत्र: १) संदर्भाकीत दस्ताऐवज

गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य विभाग
आवक क्र. 1040 दि. 16/06/20
जावक क्र.............दि.............

आत्मदीपो भव !

6037 16/6/2020


**Rambhau Mhalgi Prabodhini's**

# Centre for Institution Building and Leadership Studies

# संस्था बांधणी आणि नेतृत्व अध्ययन केंद्र


दिनांक : १२ जून २०२०

प्रति,

मा. श्री.डॉ. ईश्वर मोहुर्ले

मा. कुलसचिव,

गोंडवाना विद्यापीठ

गडचिरोली (महाराष्ट्र)

विषय :- प्राध्यापकांसाठी ऑनलाइन अध्यापन तंत्र प्रशिक्षणाचे आयोजन करण्याबाबत.

सस्नेह नमस्कार,

माझे सहकारी श्री. संतोष गोगले यांनी आपल्या सोबत झालेल्या चर्चेनुसार, आपण आपल्या विद्यापीठातील प्राध्यापक वर्गासाठी रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनीतर्फे ऑनलाइन प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करण्याबाबत उत्सुकता दर्शवून त्याबाबत प्रस्ताव पाठवायला सांगितले, त्याबद्दल आपले मनःपूर्वक आभार.

प्राध्यापक वर्गाच्या प्राथमिक गरजा लक्षात घेता डिजिटल माध्यमांद्वारे विविध ॲप्लिकेशन्स वापरून मीटिंग आयोजित करणे, अनेक लोकांशी एकाच वेळी व्हिडिओ कॉलच्या माध्यमातून संवाद साधणे, ऑनलाइन माध्यमातून वर्गासाठी अध्यापन करणे, विद्यार्थ्यांशी संवाद साधणे, विद्यार्थ्यांना गृहपाठ देणे, त्यांच्याकडून तो जमा करून घेणे इत्यादी बारकावे प्राथमिक प्रशिक्षण अभ्यासक्रमात काळाची गरज बनली आहे. त्यासाठीची उपयुक्त माध्यमे कशी हाताळावीत, त्यातील तांत्रिक बाबी आणि बारकावे, त्यांच्या गरजा, ही माध्यमे हाताळताना घ्यावयाची काळजी या सर्व गोष्टींचे प्रशिक्षण देणारा तीन दिवसांचा अभ्यासक्रम प्रबोधिनीने तयार केला आहे. त्यासाठीचा हा प्रस्ताव देत आहे.

हा अभ्यासक्रम रोज प्रत्येकी दोन तास या कालावधीचा असेल. प्रत्येक दिवशी शेवटचा अर्धा तास सहभागी प्रशिक्षणार्थींना प्रशिक्षकांशी चर्चा करता येईल. त्यामुळे त्यांना काय समजले, काय समजले नाही, काय अडचणी जाणवत आहेत याबाबत खुली चर्चा होते. लॉकडाऊनमध्येही प्रबोधिनीने राज्यातील विविध प्रांतातील शैक्षणिक संस्थांसाठी या विषयावर प्रशिक्षण आयोजित केले होते. अजूनही कार्यक्रम होत आहेत.

या कार्यशाळेचे ई-प्रमाणपत्र प्रत्येक सहभागीला मिळेल. प्रशिक्षण वर्गानंतर प्रत्यक्ष कामकाज करताना काही अडचणी आल्या तरीही प्रशिक्षकांकडून मार्गदर्शन मिळू शकेल. या प्रशिक्षणानंतर प्राध्यापक वर्गाला प्राथमिक पातळीवर ऑनलाइन माध्यमांद्वारे वर्गात शिकवणे निश्चित शक्य होईल.

आत्मदीपो भव।

**Rambhau Mhalgi Prabodhini's**

# Centre for Institution Building and Leadership Studies

## संस्था बांधणी आणि नेतृत्व अध्ययन केंद्र

तीन दिवसांच्या ऑनलाइन कार्यशाळेसाठी प्रति सहभागी रु.८५०/- (रुपये आठशे पन्नास फक्त) १८% जी.एस.टी.सह शुल्क आकारण्यात येईल. ही कार्यशाळा आपल्या सर्व प्राध्यापकांसाठी निश्चितच उपयुक्त ठरेल याची खात्री वाटते.

आपली स्नेहांकित,

स्वाती महाळंक,
कार्यकारी प्रमुख, रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनी,
पुणे कार्यालय,
८८८८१०२२०७ I swatim@rmponweb.org